# कन्या व कुमार घोसरवाड शाळेत सायबर सिक्युरिटी सेमिनार संपन्न

**घोसरवाड (प्रतिनिधी) :**

रोटरी विझडम पुणे व क्रिकहिल फौंडेशन यांचे वतीने सायबर सिक्युरिटी बाबत मार्गदर्शन कन्या व कुमार विद्या मंदिर घोसरवाड येथे संपन्न झाले.दोन्ही शाळेतील इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थी -विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

फॉरेन्सिक लॉ चे दिनेश सुभेदार यांनी सायबर गुन्हे,खबरदारी, उपाय,इंटरनेट वापरताना काळजी कशी घ्यावी ?सायबर गुन्ह्यावर प्रतिबंध व सोशल मिडियाचा जबाबदारीने वापर यासंबंधी मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी रोटरी विझडम पुणे चे अध्यक्ष -रोटे.सारंग बालंके, कुलकर्णी सर,कन्या शाळेचे मुख्याध्यापक रमेश शंकर कोळी,कुमार शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय कमते,रमेश मारूती कोळी,हिंदूराव फास्के,गुंडा परीट,ज्योती परीट,बाळासाहेब कांबळे,नंदकुमार पोवार,दशरथ खोत,अनिल मंगावे यांचेसह विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.